**शोकसंदेश**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (MMRDA) वरिष्ठ संचालक (प्रणाली/एकीकरण), श्री.भारत भूषण मोडगीळ यांचे शुक्रवार दिनांक 2 ऑक्टोबर 2020 रोजी अंधेरी येथील कोकिळाबेन रुग्णालयात आजारपणाने निधन झाले.

सर्वांशी मिळून मिसळून वागणाऱ्या हरहुन्नरी व्यक्तिमत्वाच्या श्री. मोडगीळ यांच्या निधनाने प्राधिकरणाला फार मोठ्ठा धक्का बसला आहे.

मेकॅनिकल इंजिनिअर असलेले श्री.मोडगिळ हे भारतीय रेल्वेच्या सेवेत होते. या सेवकाळात त्यांनी
1)डिव्हिजनल रेल्वे मॅनेजर, बडोदा
2)चेअरमन, रेल्वे रिक्रुतमेन्ट बोर्ड, मुंबई
3)चीफ रिजनल ऑफिसर, प.रेल्वे, चर्चगेट
4)चीफ मेकॅनिकल इंजिनिअर दक्षिण-पश्चिम रेल्वे, हुबळी
5)जनरल मॅनेजर, मध्य रेल्वे, मुंबई
या पदांवर कार्य केले आणि अशी जबाबदारीची पदे भूषवून ते 31 मे,2010 रोजी भारतीय रेल्वेच्या सेवेतून निवृत्त झाले.

सेवानिवृत्तीनंतर श्री.मोडगीळ यांनी मुंबई मेट्रो लाईन-1 चे कार्य प्रारंभापासून ती कार्यान्वित होईपर्यंतचे सर्व टप्पे यशस्वीपणे पार पडले आणि दिनांक 23 एप्रिल, 2019 रोजी ते मुंबई मेट्रोच्या वरिष्ठ संचालक (प्रणाली/एकीकरण) पदाचा कार्यभार स्वीकारण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सेवेत रुजू झाले.

श्री. मोडगीळ यांच्या अनुभवी व सक्षम नेतृत्वाखाली मुंबई मेट्रोची सर्व कामे जलदगतीने पूर्णत्वाकडे जाऊ लागली. आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेमुळे व अचूकतेमुळे त्यांनी ही सारी जबाबदारी पार पाडली. विविध बँकांकडून अर्थसहाय्य मिळवण्याही त्यांचा सिंहाचा वाटा होता.
अल्पावधीतच श्री.मोडगीळ हे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणात सर्वांचे लाडके आणि आदरणीय अधिकारी म्हणून ओळखले जाऊ लागले. प्रणाली विभागातील सर्व अधीकारी कर्मचारी श्री. मोडगीळ यांच्या नेतृत्वाखाली एका कुटुंबातील असल्यासारखे एकत्र आले. सतत हसमुख चेहरा, समोरच्या व्यक्तीला स्वतःचे म्हणणे मंडण्यास धीर देत असे.

अगदी लॉक डाऊनच्या काळातही श्री. मोडगीळ मेट्रोचे काम ठरल्यावेळी पूर्ण करण्यासाठी सतत कार्यरत होते.

श्री. मोडगीळ यांच्या पश्चात त्यांची पत्नी श्रीमती रजनी, कन्या श्रीमती गीता, पुत्र श्री. गौतम असा परिवार आहे.

एखाद्या विशिष्ट ध्येयाने झापटल्यानंतर त्या ध्येयाचा पूर्तीसाठी आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत कार्यरत राहण्याचे भाग्य कमी व्यक्तींना लाभते, ते भाग्य श्री. मोडगीळ यांना लाभले. त्यांचा प्रेमळ सहवास आणि त्यांच्या प्रचंड अनुभवाची प्राधिकरणाला खूप गरज होती.

महानगर आयुक्त श्री. आर. ए. राजीव यांनी त्याच्या निधनाबद्दल तीव्र शोक व्यक्त करताना, त्यांच्या अकाली निधनाने प्राधिकरणाचे मोठे नुकसान झाल्याचे म्हटले. तसेच त्यांच्या अकाली निधनाने मोठी पोकळी निर्माण झाली असून प्राधिकरणाला त्यांची नितांत गरज होती. प्राधिकरण एका कार्यक्षम अधिकाऱ्याला मुकला आहे, असेही ते म्हणाले.

श्री. मोडगीळ यांच्या कुटुंबियांच्या दुःखात प्राधिकरणातील सर्व अधिकारी व कर्मचारी सामील आहेत.
ईश्वर यांच्या आत्म्यास शांती देवो.